ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन उत्साहात

कुंभमेळ्यानिमित्त संत, महंतांची उपस्थिती

लोकसत्ता प्रतिनिधी

नाशिक : पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यानिमित्त गुरुवारी रामकुंड परिसरात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन करण्यात आले. कुंभमेळा स्वच्छ, सुरक्षित व भव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी शासन, प्रशासन, साधू-संत, महंत, विविध सामाजिक, धार्मिक संघटना आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक असून भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. या कार्यक्रमाकडे लोकप्रतिनिधींनी पाठ फिरवल्याने हा चर्चेचा विषय ठरला.

रामकुंड परिसरात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजनप्रसंगी उपस्थित कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज.

श्री गंगा गोदावरी पंचकोठी (तीर्थ) पुरोहित संघाच्या वतीने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीरामाच्या जयघोषात आणि वेद मंत्रोच्चारात हा सोहळा झाला. महापौर हिमगौरी आडके-आहेर, आ. सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री, उपमहापौर विलास शिंदे, जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज यांच्यासह विविध आखाड्यांचे प्रमुख साधू-संत, महंत उपस्थित होते.

मंत्री महाजन यांनी, मागील कुंभमेळ्यापेक्षा चार ते पाच पट अधिक, म्हणजेच १२ कोटींपेक्षा जास्त भाविकांच्या आगमनाची अपेक्षा पुढील कुंभमेळ्यात असल्याचे सांगितले. कुंभमेळा यशस्वी करण्याची जबाबदारी शासन, प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी विविध संघटनांनी आणि भक्तगणांनी पुढाकार घेतला असून ही स्वच्छता केवळ एका दिवसापुरती नसून सातत्याने राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी प्रत्येक नाशिककराने स्वयंसेवक बनून पुढाकार घ्यावा. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि जिल्ह्यात विविध विकासकामांना वेग आला आहे. रस्ते, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता आणि नागरी सुविधांसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची अंमलबजावणी सुरू आहे. या विकासकामांमुळे पुढील वर्षी नाशिकचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी गंगा गोदावरीचे पूजन करण्यात आले. शंखनाद आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन समारंभ भक्तीमय वातावरणात पार पडला. पुरोहित संघाच्या सदस्यांनी मंत्रोच्चार केले.

लोकप्रतिनिधींची पाठ

शिलान्यास पुजन सोहळ्याचे निमंत्रण पुरोहित संघाच्या वतीने लोकप्रतिनिधी, महापालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त यांच्यासह अन्य मान्यवरांना देण्यात आले. कार्यक्रमास महापालिका आयुक्त मनीषा खत्री कार्ही वेळ उपस्थित होत्या. जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आलेच नाही. दादा भुसे, छगन भुजबळ, नरहरी झिरवाळ या मंत्र्यांसह देवयानी फरांदे, राहुल ढिकले हे अनुपस्थित राहिले. उद्योगमंत्री उदय सामंत शहरात असतांनाही ते कार्यक्रमास उपस्थित नव्हते. लोकप्रतिनिधींनी कार्यक्रमाकडे फिरवलेली पाठ चर्चेचा विषय ठरली.

म्हाडा घोटाळ्याचा विषय मोठा नाही

गोकुळ गिते यांच्या माघारीवरुन गिरीश महाजन यांची सारवासारव

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : विधान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात गोकुळ गिते यांच्या माघारीचा संबंध त्यांचे बंधू भाजपचे माजी स्थायी सभापती गणेश गिते यांचा म्हाडा प्रकरणात दाखल गुन्ह्यात जामीन रद्द करण्यासाठी झालेल्या कथित पत्र व्यवहाराशी जोडला गेला. या संदर्भात उपस्थित झालेल्या प्रश्नावर मंत्री गिरीश महाजन यांनी सारवासारव केली.. म्हाडा प्रकरणात केवळ गिते यांचे नाव नसून अनेकांची नावे आहेत. तो विषय इतका मोठा नाही की, त्यामुळे नोटिसीला घाबरून गोकुळ गिते हे माघार घेतील, असे त्यांनी सूचित केले.

विधान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी चर्चेअंती रिंगणातून माघार घेतल्याचे गुरुवारी गिरीश महाजन, उदय सामंत व दादा भुसे या मंत्र्यांच्या उपस्थितीत पत्रकार परिषदेत जाहीर केले. काल-परवापर्यंत गोकुळ हे कुठल्याही परिस्थितीत माघार घेणार नसल्याचे सांगत होते. त्यांनी अकस्मात माघार घेण्यामागे दबाव तंत्राचा अवलंब असल्याचे आरोप होत आहेत. मंत्री महाजन आणि सामंत यांनी हे नाकारले. या निवडणुकीत माजी स्थायी सभापती गणेश गिते आणि त्यांचे बंधू गोकुळ या दोघांनी अर्ज भरले होते. मंत्री महाजन यांच्या सूचनेनंतर गणेश गिते यांनी रिंगणातून माघार घेतली. परंतु, गोकुळ यांची उमेदवारी कायम होती. सोनू मनवाणी आणि दीपक करमचंदांनी या बांधकाम व्यावसायिकांना अटक झाली. अटक टाळण्यासाठी अनेक बड्या संशयितांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. या प्रकरणात नायब तहसीलदार नितीन पाटील, नगररचना विभागाचे सहायक संचालक कल्पेश पाटील आणि भूमी अभिलेख विभागाचे उपअधीक्षक बिपीन काजळे यांनाही शहर गुन्हे शाखेने अटक केली.

- शासनाच्या सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत नाशिक महापालिका क्षेत्रातील चार हजार चौरस मीटरपेक्षा अधिक बांधकाम असलेल्या गृह प्रकल्पात २० टक्के सदनिका आर्थिक दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. ही घरे बांधून ती म्हाडाकडे वर्ग करावी लागतात. विकासकांनी म्हाडाला ही घरेच दिली नाहीत. अशा ४९ प्रकरणात विकासक आणि जागा मालक अशा जवळपास ९९७ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आला.
- संशयितांनी भूमी अभिलेख कार्यालयाची बनावट स्वाक्षरी, शिक्के, नकाशे, आकार फोड पत्रक (अर्ज क्रमांक १२) अशी कागदपत्रे खरी असल्याचे भासवत जमिनीचे तुकडे करत शासनाची फसवणूक केल्याचे हे प्रकरण आहे. यातील संशयितात गणेश गिते यांचे नाव आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर दिनेश उर्फ

बहुचर्चित म्हाडा घोटाळा काय आहे ?

उदय सामंत व दादा भुसे या मंत्र्यांच्या एकत्रित पत्रकार परिषदेत जाहीर केले. काल-परवापर्यंत गोकुळ हे कुठल्याही परिस्थितीत माघार घेणार नसल्याचे सांगत होते. त्यांनी मंत्री, स्थानिक पदाधिकारी अक्षरशः कामाला लागले होते.

गुरुवारी महायुतीचे तीन मंत्री आणि पदाधिकाऱ्यांसमवेत चर्चा झाल्यानंतर नाशिक मतदारसंघातील आपला प्रचार थांबवित असल्याचे गोकुळ गिते यांनी जाहीर केले. भाजपचे माजी स्थायी सभापती गणेश गिते यांचे बंधू गोकुळ यांची उमेदवारी शिंदे गटासाठी डोकेदुखी ठरली होती. त्यांच्या माघारीसाठी प्रमुख नेत्यांपासून ते शिंदे गटाच्या स्थानिक आमदारांपर्यंत सर्वच प्रयत्न करत होते.

नाशिकची जबाबदारी मंत्री उदय सामंत यांच्यावर असल्याने त्यांना नाशिकमध्ये कही दिवस मुक्काम ठोकावा लागला. गिते यांचा निर्णय जाहीर झाल्यानंतर सामंत यांनी महायुती एकसंघ राखण्यासाठी ज्यांनी, ज्यांनी प्रयत्न केले, त्यांचे आभार मानले.

चर्चेअंती माघार

गणेश गिते हे मंत्री गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय मानले जातात. गोकुळ यांच्या उमेदवारीने संशयायी सुई महाजन यांच्याकडे होती. शिवसेनेच्या गोटातून तसाच सूर उमटत होता. गिते बंधू महाजन यांचेच नांव घेत असल्याने राजकीय वर्तुळात वेगवेगळे तर्कवितर्क लढविले जात होते. गोकुळ यांच्या माघारीसाठी पाच ते सहा दिवसांपासून चर्चा सुरु होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाली. गोकुळ यांची कुठलीही मागणी नव्हती. पुढील काळात त्यांचा निश्चितपणे विचार केला जाईल. गोकुळ हे आमच्या परिवारातील असून महायुतीत आमचा मापूस बंडखोरी करणे योग्य ठरणार नव्हते. चर्चेअंती त्यांनी माघार घेतली.

अर्ज भरण्याच्या काळात गणेश गिते यांच्यावर दाखल गुन्ह्यात जामीन रद्द व्हावा, यासाठी न्यायालयाशी कही पत्रव्यवहार झाल्याचे सांगितले जात होते. मध्यंतरी मंत्री सामंत यांनी ही बाब नाकारली होती. कोणाला जाणीवपूर्वक त्रास देण्याची पक्षाची संस्कृती नसल्याचे त्यांनी म्हटले होते.

गुरूवारी या संदर्भात मंत्री महाजन यांच्याकडे विचारणा झाली असताना त्यांनीही या प्रकारे दबावतंत्राची बाब फेटाळली. म्हाडाचा विषय न्यायप्रविष्ट असून माघारीशी त्याचा संबंध जोडू नये, असे मंत्री महाजन यांनी स्पष्ट केले. म्हाडा प्रकरणात केवळ गिते नाही तर अनेकांची नावे आहेत. तो विषय इतका मोठा नाही. नोटिसीला घाबरून माघार घेणारे गिते नाहीत, असे त्यांनी सूचित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा झाल्यानंतर माघार घेतली.

महायुतीतील वादावर गोकुळ गिते यांच्या माघारीने पडदा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नाशिक : विधान परिषदेच्या नाशिक मतदारसंघात अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांच्या उमेदवारीने महायुतीत निर्माण झालेल्या संशयाच्या वातावरणावर अखेर त्यांची माघार झाल्यामुळे तुर्तास पडदा पडला आहे. गोकुळ यांच्या माघारीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या प्रमुख नेत्यांनाही मध्यस्ती करावी लागली. गिरीश महाजन, उदय सामंत, दादा भुसे या महायुतीच्या तीन मंत्र्यांना काही दिवस नाशिकमध्येच ठाण मांडावे लागले. गोकुळ यांच्या उमेदवारीचा संबंध मंत्री गिरीश महाजन यांच्याशी जोडला गेल्याने त्यांच्यासह भाजपची पंचाईत झाली. गिते मैदानात राहिल्यास महायुतीच्या मतांची फाटाफूट होण्याचा धोका असल्याने त्यांची मनधरणी करण्यात प्रमुख नेत्यांपासून ते शिंदे गटाच्या स्थानिक आमदारांपर्यंत सर्वच प्रयत्न करत होते.

नाशिक येथे आयोजित बैठकीत मंत्री गिरीश महाजन, मंत्री उदय सामंत यांच्याबरोबर गणेश गिते, गोकुळ गिते (छायाचित्र- यतीश भानू)

नाशिकच्या जबाबदारीची मंत्री उदय सामंत यांच्यावर असल्याने त्यांना नाशिकमध्ये कही दिवस मुक्काम ठोकावा लागला. गिते यांचा निर्णय जाहीर झाल्यानंतर सामंत यांनी महायुती एकसंघ राखण्यासाठी ज्यांनी, ज्यांनी प्रयत्न केले, त्यांचे आभार मानले.

आजपासून जीएसटी परिषद

नाशिक : द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया (आयसीएआय) नाशिक शाखेकडून 'जीएसटी आणि अप्रत्यक्ष कर समिती' या विषयावर १२ आणि १३ जून रोजी जीएसटी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. अशोका मार्गावरील आयसीएआय भवन येथे सकाळी नऊ ते पाच या वेळेत ही परिषद होणार आहे.

परिषदेत प्रामुख्याने जीएसटी कायदे, त्यातील महत्त्वाचे बदल, न्यायालयीन निर्णय आणि रिअल इस्टेट क्षेत्रावरील त्याचा परिणाम अशा विविध तांत्रिक मुद्द्यांवर देशभरातून आलेले सनदी लेखापाल आणि तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. सनदी लेखापाल प्रसन्ना कुमार डी. राजेंद्र कुमार पी. यांची विशेष उपस्थिती राहणार असल्याची माहिती नाशिक शाखेचे अध्यक्ष अभिजित मोदी यांनी दिली. या परिषदेच्या माध्यमातून जीएसटीच्या कायदेशीर चौकटीला अधिक सुलभतेने समजून घेण्याची एक उत्तम संधी मिळणार आहे.

राजेंद्र शिंदे यांचे निधन

नाशिक : शहरातील प्रसिध्द व्हॉलीबॉल प्रशिक्षक राजेंद्र शिंदे यांचे अल्पशा आजाराने ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या मागे मुलगा, मुलगी, पत्नी आणि तीन भाऊ असा परिवार आहे शिंदे यांनी अनेक राष्ट्रीय खेळाडू घडविले असून त्यांची मुलगी राजश्री ही देखील राष्ट्रीय खेळाडू आहे. मुलगा ऋतिक हा राष्ट्रीय पातळीवरील तलवारबाजीचा खेळाडू आहे. शिंदे यांच्या निधनाने नाशिकच्या क्रीडा क्षेत्राला धक्का बसला आहे.

ICICI Home Finance कॉर्पोरेट कार्यालय: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एफएचसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९, भारत.

शाखा कार्यालय: दुकान क्र. ६०४ व ६०५, ललित रंगटा इयु, ६वा मजला, रंगटा सुप्रीमस, चांडक सर्कल, सिडको कॉलनी, नाशिक, महाराष्ट्र- ४२२००२

खाजगी करारद्वारे स्थावर मालमत्तेची विक्री करण्याची सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२च्या नियम ८(८) सहवाचता नियम ९(१) सहवाचता सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत खाजगी करारद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी सूचना.

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड (आयसीआयसीआय एचएफसी) यांनी खाली नमूद केलेल्या सहाय्य देणाऱ्यांच्या मालमत्तेच्या विक्रीसाठी अनेक ई-लिलाव केले, तथापि, आता सर्व ई-लिलाव अयशस्वी झाला. आता, एच्या हस्तक्षेप करीदीदारी आयसीआयसीआय एचएफसीकडे रु. ५,७०,०००/- (रु. सदर मालमत्ता खरेदी करण्याचा प्रस्ताव दिला आहे. संबंधाकरणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित धनकोकडे सहाय देतली आहे आणि आकारली आहे, त्याचा तपशा आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे, जे खाली दिलेल्या सविस्तर तपशीलानुसार खाजगी करारद्वारे "जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे" आणि "तिथे जे काही आहे ते" धारण विकले जातील.

अ. क्र.	कर्जदार/ सहकारी कर्जदार/ जामीनदार/ कायदेशीर वारस यांचे नाव. कर्ज खाते क्र.	सुरक्षित मालमत्तेचे तपशील/ जर काही असतील तर, ज्ञात धारणेसह	थकबाकीची रक्कम	अंदाजित किंमत	मालमत्ता इसारा ठेव अनामत	लिलावाची तारीख आणि वेळ	ई-लिलाव तारीख	एक दिवसाच्या लिलावाच्या तारखेपूर्वी	सार्वजनिक सुट्टी	टप्पा
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)	(एच)	(आय)		
१	नवनाथ शामराव गायकवाड (कर्जदार) एलएएन क्र. एलएएनएफएस००००१६२२२००	दुकान क्र. ३१, ३२, ३३, ३४, ३५, २ऱा मजला, गणेशी व्हेंचर, सर्वेक्षण क्र. १२०/४/प्लॉट क्र. २ आणि ६/१/प्लॉट क्र. १४, गाव चेहेडी बुद्रुक, ता. व जि. नाशिक.	रु. १४,५८,२७६/- ०८ जून, २०२२	रु. ५३,००,०००/-	रु. ५,३०,०००/-	दि. १२ जून, २०२६, सकाळी ११.०० ते. ३ पर्यंत	दि. १२ जून, २०२६ रोजी सकाळी ११.०० ते. १२.०० पा.	रु. जून, २०२६ दुपारी ०४.०० पा. आधी	नाहीत	तीन

अनिवार्य लिलाव आमच्या लिलाव एजन्सी खंडणु टुरट वेंचिल्स लॉजिस्टिक प्रायव्हेट लिमिटेडच्या वेबसाइटवर (पुढामुल लिंक- https://BidDeal.in) आयोजित केला जाईल. इच्छुक बोलीदाराने इसार ठेव अनामत रक्कम (ईएमडी) आरटीजीएस/डिमांड ड्राफ्ट (डीडी) (कॉलम ई या संदर्भ पाहा) लेखापाल शीर्षकाच्या नमूद केलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर दि. २५ जून २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी, दुपारी ०४.०० वाजण्यापूर्वी जमा करणे आवश्यक आहे. संभाव्य बोलीदारांनी बोली अर्ज आणि बोली आणि सर्वी आणि अर्जाची स्वाक्षरी केलेली प्रत दि. २५ जून, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी लेखापाल या नमूद केलेल्या आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर सायं. ५.०० वाजेपर्यंत सादर करावे. इसारा ठेव अनामत वजावजीच्या लिंकद्वारे (डीडी) ऑनलाइन/आरएटीजी पॅकेजद्वारे "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड - लिलाव" यांच्या नावे असावा, जो लेखापाल या नमूद केलेल्या शाखा कार्यालयाच्या पत्त्यावर देय असेल. सामान्य जनतेला विनंती आहे की, त्यांनी वर नमूद केलेल्या इच्छुक बोलीदाराने देऊ केलेल्या स्वरूपेचा ऱ्हास न होता, वर नमूद केलेल्या इच्छुक बोलीदाराने अधिक केलेल्या स्वरूपेचा जास्त बोली आयसीआयसीआय एचएफसी यांच्याकडून प्राप्त न झाल्यास, सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ९ (१) सहवाचता नियम ८(८) नुसार सदर ठेवलेली मालमत्ता पहिल्या इच्छुक बोलीदाराला विकली जाईल.

तपशील, विक्रीच्या अटी व शर्ती, किंवा निविदा सादर करण्यासंबंधी कोणत्याही अधिक स्पष्टीकरणासाठी, कृपया आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेडशी ९१२२८०७३७० या क्रमांकावर किंवा वरील टुरट वेंडीहेल होम ऐरेक क्रमांक ६२००-२२-१२०० यावर संपर्क साधा.

अधिकृत अधिकारी कोणतीही अतिरिक्त कारणे न देता कोणतीही किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार राखून आहे.

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तीसाठी, कृपया https://www.icicihfc.com वर भेट द्या.

दिनांक: १२ जून, २०२६
ठिकाण: नाशिक

अधिकृत अधिकारी, "आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड"
सीआयएन क्रमांक:- यू५९१२२एमएच१९९९पीएलसी१२०२०६

ई-लिलाव विक्री सूचना

एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड

सीआयएन : यु६७१०एमएच२००७पीएलसी१७२७५९

दिलेल्या संहेत्र आणि नोंदणीकृत कार्यालय : एडेलवाईस हाऊस, सीएसटी रोडजवळ, कलिना, मुंबई ४०००९८

सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ ('नियम') च्या नियम ८(६) आणि ९(१) ची तरतूद सहवाचता सिक्युरिटायझेशन ॲंण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सापुवे 'सरफेसी कायदा') अनुषंगे जंगमेतर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

येथे नमूद केलेल्या असाइनस्ना आर्थिक सुविधा (सापुवे 'असाइनर/मूळ कर्जदाता' म्हणून संदर्भित) **एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड** यांना देण्यात आल्या आहेत. जे दिलेल्या कालावधीमध्ये त्यापोटी नमूद केलेल्या विविध दुरुटना विशेषत म्हणून त्यांच्या इतर्ननुसार शाप झाले आहेत. उपरोक्त असाइनमेन्ट अनुक्रमाने **इंएआरसी** यांनी असाइनरची भूमिका घेतली आणि सुरक्षित धनको म्हणून त्यांचे अधिकार वापरत आहेत. इंएआरसी यांनी सुरक्षित धनको म्हणून त्यांच्या क्षमतेनुसार, सरफेसी कायदा आणि त्याअंतर्गत नियमांच्या कलम १३(४) अंतर्गत खाली नमूद केलेल्या स्थावर सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला होता.

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार आणि जामीनदारांना **१५ दिवसांची** सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षित धनको यांच्या नावे गहाण ठेवलेली खाली वर्णन केलेली स्थावर सुरक्षित मालमत्ता, ज्याचा यांच्या तारा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने (एओ) वेताच आहे, ईएआरसी यांच्याकडे खाली नमूद केलेल्या रकमेची खुली आणि प्रामाणिक लिलाव द्वारे/आसीन मिळालेल्या बोलण्याही पैशाप्रतीची कमा केलेले पुढील त्याच आणि हात खर्चाच्या, **'जसे आहे, तिथे आहे', 'जसे आहे, तसे आहे' आणि 'तिथे जे काही आहे'** या तत्वांवर विकली जाईल. प्रत्येक मालमत्तेसाठी आरक्षित किंमत आणि इसार ठेव अनामत खाली नमूद केले आहे.

लिलावासाठी ठेवलेल्या सुरक्षित मालमत्तेचे तपशील :

अ. क्र.	कर्ज खाते क्र./ विक्री करणारी संस्था	कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदारांचे नाव	दुरुटचे स्वरूप	दि. ०९.०६.२०२६ रोजीस/ भारतीय रुपयांमधील एकूण देय थकबाकी	आरक्षित किंमत (भारतीय रुपयात)	इसार ठेव अनामत (इएमडी) भारतीय रुपयात	लिलावाची तारीख आणि वेळ	ताबा प्रकार
१	**बी. बीरकार अभिषेक दिगंबर (कर्जदार) आणि श्रीमती शबाना विवाही वाबुभाई (सह-कर्जदार)**	**ईएआरसी ट्रस्ट एससी ४४९**	रु. ३१,३१,७२१.१५/-	रु. १६,३०,०००/-	रु. १,६३,०००.००/-	दि. **१५.०७.२०२६ रोजी दुपारी १.३० वाजता**	भौतिक ताबा

मालमत्तेचे वर्णन : फर्टर-पुर्वी-०६, टॉवर-ए, विंग ए-४, पहिला मजला (मंबूर बांधकाम योजनेनुसार), आर्केडान टाईप-ए, फ्लॅट १, अ. क्र. ६०७/२-६२९(पी), हरी ओम सोल्युशनस, मुंबई-आग्रा महामार्ग, गाव गोदे दुवाला, ता.- इगतपुरी, जि.- नाशिक- ४२२४०३ (मोजमापे बिल्टअप क्षेत्रफळ ४४.१३६ चौ. मी. आणि कार्पेट क्षेत्रफळ ५५.७४२ चौ. मी.)

लिलाव प्रक्रियेसंदर्भातील महत्त्वाची माहिती

१.	ईएमडी हिमांक हाफर (डीडी) मुंबई येथे देय असलेल्या 'एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड - ईएमडी अकाउंट' यांच्या नावे काढले जातील.
२.	आरटीजीएस पद्धतीने ईएमडी पेमेंट खालील प्रकारे करावे लागेल: **खाते क्रमांकाचे नाव :** एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड - ईएमडी अकाउंट, **खाते क्रमांक :** ०००४०५१५८६२२, **बँकेचे नाव :** आयसीआयसीआय बँक, **आयएफएससी कोड :** आयएफएससी आयसीआयसी०००००४
३.	**ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख**	लिलावाच्या तारखेच्या १ दिवस अगोदर मिळाले
४.	**बोली सादर करण्याचे ठिकाण**	९वा मजला, एडेलवाईस हाऊस, सीएसटी रोडजवळ, कलिना, मुंबई- ४०००९८
५.	**लिलावाचे ठिकाण (लिलावासाठी वेबसाइट)**	ई-लिलाव (https://auction.edelweissarc.in)
६.	**फोन नंबरसह संपर्क व्यक्ती**	टोल फ्री क्र. - १८००२६६६५४० वेबसाइट - https://auction.edelweissarc.in/
७.	**मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ**	आधी ठरवलेल्या भेटीनुसार

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया ईएआरसी यांच्या वेबसाइटवर दिलेल्या लिंकचा संदर्भ घ्या, म्हणजेच https://auction.edelweissarc.in.

दिनांक : १२.०६.२०२६, ठिकाण : नाशिक

सही/- अधिकृत अधिकारी, एडेलवाईस ॲसेट रिकन्स्ट्रक्शन कंपनी लिमिटेड यांच्यासाठी

Edelweiss Asset Reconstruction

ऑक्सिस फायनान्स लिमिटेड
(CIN: L65110GJ1993PLC020769)
ऑक्सिस हाऊस, सी-२, माहिम इंटरनॅशनल सेन्टर, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई-४०००२५.

जोडपत्र IV [नियम ८(१) पहाता]
ताबा सूचना (अचल मालमत्तेसाठी)
[सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, २००२ मधील नियम ८(१) सह वाचण्यात येणाऱ्या जोडपत्र IV नुसार]

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **ऑक्सिस फायनान्स लिमिटेड (AFL)** चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनेन्शिअल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, २००२ मधील नियम ३ सह वाचण्यात येणाऱ्या अनुच्छेद १३(१२) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत दि. **२६ नोव्हेंबर, २०२४** रोजी एक मागणी सूचना जारी केली ज्यात खाली वर्णन केलेली अचल मालमत्ता तसेच ठेवलेल्या **कर्जदार/ जामीनदार/ गहाणकार (१) दिलीप विठ्ठलराव घरट (कर्जदार/ गहाणकार), २) नवोन्मेष दिलीप घरट (सह-कर्जदार/ गहाणकार) आणि दिलीप घरट** यांना दि. **५ नोव्हेंबर, २०२४** रोजीनुसार **मालमत्तेवरील कर्जाची रु.३,०४,००,७३७/- (रुपये तीन कोटी चार लक्ष साडशे सदतीस फक्त) आणि व्यवसाय कर्जाची रु.२३,१९,२३४/- (रुपये तेवीस लक्ष एकोणीस हजार दोनशे चौतीस फक्त)** या भरण्याच्या दिनांकपर्यंतच्या करारातील दराने पुढील त्याजासह सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते.

कर्जदार/ जामीनदार/ गहाणकार यांनी सदर रकमेचा भरणा न केल्याने याद्वारे कर्जदार/ जामीनदार/ गहाणकार आणि आम जनतेस सूचित करण्यात येते की सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) रूल्स, २००२ मधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या ॲक्सिस फायनान्स लिमिटेडच्या अनुच्छेद १३(४) अंतर्गत खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे.

याद्वारे कर्जदार/ जामीनदार/ गहाणकार आणि आम जनतेस सावधगिरीची सूचना देण्यात येते की त्यांनी सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणताही व्यवहार करू नये आणि असा कोणताही व्यवहार केल्यास तो **ऑक्सिस फायनान्स लिमिटेडच्या दि. २७ मे, २०२६** रोजीनुसार **मालमत्तेवरील कर्जाची रु.३,५९,१२,७२४ (रुपये तीन कोटी एकोणसाठ लक्ष बाराशत चौवीस फक्त) आणि व्यवसाय कर्जाची रु.२८,७९,९७५ (रुपये अठ्ठावीस लक्ष एकाणऐंशी हजार नऊशे पंचाहत्तर फक्त)** अधिक संपूर्ण भरणा किंवा वसुलीच्या दिनांकपर्यंतचे करारातील दराने पुढील त्याज अधिक खर्च, शुल्क, अधिभार इ. रकमेच्या भारधीन असेल.

अनामत मता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदारांचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (८) व उप-विभाग (१३) च्या तसुदीकडे वेधण्यात येत.

अचल मालमत्तेचे वर्णन

शिवराया हॉस्पिटल, फर्नाट क्र. ७३, क्षेत्रफळ सुमारे २८०.२ चौ.मी. आणि प्लॉट क्र. ७४, क्षेत्रफळ सुमारे २८०.२ चौ.मी. एकूण क्षेत्रफळ सुमारे ५६०.४० चौ.मी., सर्व्हे क्र. २२३/१/१, अंबड खुर्द गाव, ता. व जि. नाशिक, नाशिक महानगरपालिका, नाशिक- ४२२०१० च्या हद्दीत.

दिनांक: ११ जून २०२६ — **ऑक्सिस फायनान्स लिमिटेडकरिता**
स्थान : नाशिक — **प्राधिकृत अधिकारी**

peoplehome पीपल होम फायनान्स लिमिटेड
(पूर्वीची कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड) CIN क्र. U65990DL2017PLC322041
नोंदणीकृत कार्यालय: १९३मध्यू- सी विंग, दी स्पॉट, २९, सेनापती बापट मार्ग, दादर पश्चिम, मुंबई- ४०००२८, महा. www.peoplehome.in | टेलि. क्र. +९१ २२ ४५०३६०००

ताबा सूचना
(अचल मालमत्तेसाठी) [(जोडपत्र IV) नियम ८ (१)]

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार **पीपल होम फायनान्स लिमिटेड** (पूर्वीची कॅपिटल इंडिया होम लोन्स लिमिटेड) [CIN क्र. U65990DL2017PLC322041] चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ (" ॲक्टनिय") अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस